RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ८२ ] सोमवार, जून १, २०२६/ज्येष्ठ ११, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २८४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मे, २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२६/प्र.क्र.४१/मुद्रांक-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक मातंधो-२०२५/प्र.क्र.८३/उद्योग-२, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ द्वारे, महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण -२०२५ [यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण-२०२५" असा केला आहे] घोषित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण-२०२५ द्वारे, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटे व प्रकल्पांच्या पात्र प्रवर्गासाठी, इतर बाबींबरोबरच, मुद्रांक शुल्कात सूट देण्याच्या स्वरूपात आर्थिक प्रोत्साहने देण्याचे घोषित केलेले आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्याने, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उक्त महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण -२०२५ नुसार युनिटांच्या किंवा प्रकल्पांच्या पात्र प्रवर्गाच्या बाबतीत, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांवर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या विविध अनुच्छेदांन्वये आकारण्यायोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात, अनुसूचीच्या स्तंभ

(३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत, ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा उक्त महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण-२०२५ अंमलात असेपर्यंत, पुढील शर्तींस अधीन राहून, माफ करीत आहेः-

**शर्ती.—**

(१) ज्या महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटने आधीच मुद्रांक शुल्क माफीचा लाभ घेतलेला आहे, ते, केवळ युनिटच्या स्थलांतराकरिता मुद्रांक शुल्क माफीसाठी पात्र असणार नाही.

(२) जर महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटाने किमान २५ टक्के अतिरिक्त नियत भांडवली गुंतवणूक केलेली असेल तर, त्यास, विस्तार / विविधीकरण युनिट म्हणून समजण्यात येईल आणि ते मुद्रांक शुल्कात माफीसाठी पात्र असेल.

(३) ही माफी केवळ वैध मान्यता असलेल्या जागेच्या बाबतीतच उपलब्ध असेल, ज्यामध्ये लागू असेल तेथे प्रारंभ प्रमाणपत्र / रेरा नोंदणी / सक्षम प्राधिकरणाची मान्यता यांचा समावेश असेल.

(४) जर कोणतेही पात्र युनिट प्रकल्प सुरू करण्यास कसूर करील किंवा उक्त महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण-२०२५ याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करीत असेल तर, देण्यात आलेली मुद्रांक शुल्क माफी मागे घेतली जाईल व जणू काही माफी दिली नव्हती असे समजून संपूर्ण मुद्रांक शुल्क शास्तीसह वसूल केले जाईल.

(५) युनिट, उद्योग विभागाकडून, इतर कोणत्याही शासकीय धोरणाअंतर्गत, समान लाभ उपलब्ध झाला नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) सादर करील.

**स्पष्टीकरण.—**

(१) "महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) धोरण-२०२५" याचा अर्थ, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे जाहीर केलेले धोरण, असा आहे.

(२) "महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिट" याचा अर्थ, ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी किंवा त्या संबंधित हालचालींमध्ये गुंतलेले व सक्षम प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केलेले युनिट, असा आहे.

(३) या अधिसूचनेमध्ये वापरले गेलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा उक्त धोरणामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

## अनुसूची

| अनु. क्रमांक (१) | युनिटे/हस्तांतरणांचे विवरण (२) | माफीची मर्यादा (३) | अनुसूची-एकच्या अनुच्छेदांखालील संलेखांचे प्रकार (४) |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक किंवा खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुलांतील (आय टी पार्कस)/ ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स संकुलांतील नवीन महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटे व विद्यमान युनिटांचा विस्तार | १०० टक्के | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्कलेख निक्षेप (अनुच्छेद -६), अभिहस्तांतरण (अनुच्छेद -२५), अतिरिक्त भार (अनुच्छेद -३३), भाडेपट्टा (अनुच्छेद -३६), गहाणखत (अनुच्छेद -४०), प्रतिभूति बंधपत्र (अनुच्छेद -५४). |

| अनु. क्रमांक (१) | युनिटे/हस्तांतरणांचे विवरण (२) | माफीची मर्यादा (३) | अनुसूची-एकच्या अनुच्छेदांखालील संलेखांचे प्रकार (४) |
|---|---|---|---|
| २ | विशिष्ट आर्थिक प्रक्षेत्र किंवा भारताच्या सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी संकुलांतील नोंदणीकृत नवीन महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटे | १०० टक्के | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्कलेख निक्षेप (अनुच्छेद -६), अभिहस्तांतरण (अनुच्छेद -२५), अतिरिक्त भार (अनुच्छेद -३३), भाडेपट्टा (अनुच्छेद -३६), गहाणखत (अनुच्छेद -४०), प्रतिभूति बंधपत्र (अनुच्छेद -५४), भाडेपट्ट्याचे अभिहस्तांकन (अनुच्छेद-६०). |
| ३ | सार्वजनिक किंवा खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुलांच्या (आय टी पार्कस)/ ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स संकुलांच्या बाहेरील नवीन महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी युनिटे व विद्यमान युनिटांचा विस्तार | १०० टक्के | तारणगहाण, तारण, ताबेगहाण, हक्कलेख निक्षेप (अनुच्छेद -६), अभिहस्तांतरण (अनुच्छेद -२५), अतिरिक्त भार (अनुच्छेद -३३), भाडेपट्टा (अनुच्छेद -३६), गहाणखत (अनुच्छेद -४०), प्रतिभूति बंधपत्र (अनुच्छेद -५४). |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 29th May, 2026.

**Order**

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2026/C.R.No.41/Mudrank-2.— Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. Matandho-2025/C.R. No.83/Ind-2, dated the 3rd November 2025, declared the Maharashtra Animation, Visual Effects, Gaming, Comics and Extended Reality (AVGC-XR) Policy–2025 (hereinafter referred to as "the said AVGC-XR Policy–2025") ;

And whereas, under the said AVGC-XR Policy–2025, the Government has declared to provide, inter alia, fiscal incentives in the form of exemption of stamp duty to the eligible category of AVGC-XR units and projects under the said AVGC-XR Policy-2025.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act, 1958 (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act") the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty to the extent specified in column (3) of the Schedule appended hereto, chargeable under various Articles of Schedule-I appended to the said Act, on the instruments specified in column (4) of the Schedule, in respect of the eligible category of AVGC-XR units or projects as per the said AVGC-XR Policy–2025 specified in column (2) of the Schedule, for the period of five years commencing on the 3rd November 2025 or till the said AVGC-XR Policy–2025 is in force, subject to the following conditions, namely :-—

**Conditions.—**

(1) An AVGC-XR unit which has already availed stamp duty exemption shall not be eligible for exemption for mere relocation of the unit.

(2) An existing AVGC-XR unit making at least 25% additional fixed capital investment shall be treated as an expansion/diversification project and shall be eligible for exemption.

(3) The exemption shall be available only in respect of premises having valid approval, including Commencement Certificate / RERA registration / approval of competent authority, wherever applicable.

(4) If any eligible unit fails to commence the project or violates any condition of the said AVGC-XR Policy–2025, the exemption granted shall stand withdrawn and the full stamp duty along with penalty shall be recoverable as if no exemption had been granted.

(5) The unit shall submit a No Objection Certificate (NOC) from the Industries Department certifying that it has not availed similar benefits under any other Government policy.

**Explanation.—**

(1) "AVGC-XR Policy-2025" means the policy declared by Government Resolution dated 3rd November 2025.

(2) "AVGC-XR Unit" means a unit engaged in Animation, Visual Effects, Gaming, Comics, Extended Reality or related activities and certified by the competent authority.

(3) Words and expressions used but not defined in this Notification shall have the same meanings as assigned to them in the said Policy.

*Schedule*

| **Sr. No.** (1) | **Description of Units/ Transactions** (2) | **Extent of Remission** (3) | **Types of Instruments under Articles of Schedule-I** (4) |
|---|---|---|---|
| 1. | New AVGC-XR units and expansion of existing units in Public or Private IT Parks / AVGC Parks | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further Charge (Article 33), Lease (Article 36), Mortgage Deed (Article 40), Security Bond (Article 54). |
| 2. | New AVGC-XR units registered in SEZ or STPI | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further Charge (Article 33), Lease (Article 36), Mortgage Deed (Article 40), Security Bond (Article 54), Transfer of Lease (Article 60). |
| 3. | New AVGC-XR units and expansion of existing units outside Public or Private IT Parks / AVGC Parks | 100% | Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (Article 6), Conveyance (Article 25), Further Charge (Article 33), Lease (Article 36), Mortgage Deed (Article 40), Security Bond (Article 54). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.